परसेवेत द्यावयाच्या मासिक
अंशदानाची आकारणी

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग,
शासन निर्णय क्रमांक एफएनएस १०८३/सीआर-२५८/८३/एसईआर-८,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक ३० जून १९८३.

## शासन निर्णय

महाराष्ट्र नागरी सेवा [पदग्रहण अवधि, परसेवा आणि निलंबन, बडतर्फी व काढून टाकणे या मधील वेतन] नियम १९८१ मधील परिशिष्ट [४] व शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक पीईएन २१८०/सीआर-३५४/८०/एसईआर-८, दिनांक २ मे ८१ च्या तरतुदींनुसार शासकीय कर्मचा-यांचे क्रियाशील परसेवेच्या कालखंडात देय होणारे सेवा निवृत्तीचे अंशदान, पदाचे कमाल वेतन अधिक शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक पीईएन् १०७९/सीआर-९१७/एसईआर-४ दिनांक १९ सप्टेंबर ७९ च्या तरतुदीनुसार अशी कमाल वेतनाशी समुचित असलेले महागाई वेतन यावर आकारण्यात येते. यासाठी, शासकीय कर्मचारी परसेवेवर जातांना धारण करीत असलेल्या पदाचे कमाल वेतन अथवा परसेवेवर असतांना त्याला एखाद्या पदावर "प्रपत्र पदोन्नती" देण्यात आली असेल तर त्या पदाचे कमाल वेतन लक्षांत घेतले जाते.

२. शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक पीईएन् १०८२/सीआर-८७६/एसईआर-४, दिनांक २७ जुलै ८२ अनुसार महागाई भत्त्याचा आणखी काही भाग सेवानिवृत्तीच्या लाभासाठी वेतन म्हणून धारण्यात आल्यामुळे या संबंधात आवश्यक ते आदेश काढण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता.

३. शासन आता असा निदेश देत आहे की, शासकीय कर्मचा-यांच्या क्रियाशील परसेवेच्या कालखंडात देय होणारे सेवानिवृत्तीचे अंशदान वेतन, श्रेणीचे कमाल वेतन अधिक शासन निर्णय, वित्त विभाग क्र. पीईएन् १०८२/सीआर ८७६/एसईआर ४ दिनांक २७ जुलै ८२ च्या जोडपत्रामध्ये दर्शविल्याप्रमाणे अशा कमाल वेतनाच्या समुचित "महागाई वेतन" व जादा महागाई वेतन [ D.P. and further D.P. ] यावर आकारण्यात यावे. यासाठी परसेवेवर जाताना तो धारण करीत असलेल्या पदाचे कमाल वेतन अथवा परसेवेवर असताना त्याला एखाद्या पदावर "प्रपत्र पदोन्नती" देण्यात आली असेल तर त्या पदाचे कमाल वेतन लक्षात घेण्यात यावे.

४. प्रस्तुत आदेश हे, ते निर्गमित झाल्याच्या दिनांकानंतर परसेवेची जी प्रकरणे निर्माण होतील त्यानाच लागू होतील. पूर्वीचे प्रकरणांचे बाबतीत हे आदेश परसेवेची सध्याची मुदत पुढील कालावधीसाठी वाढविण्यात येणार असेल तर असा कालावधी ज्या दिनांकापासून वाढविला जाईल त्या दिनांकापासून लागू होतील किंवा ज्या प्रकरणात परसेवेचा कालावधी विनिर्दिष्ट केलेला नसेल तेथे आदेश निर्गमित

झाल्याच्या दिनांकापासून एक वर्षानंतर लागू होतील.

५. या शासन निर्णयाची इंग्रजी प्रत सोबत जोडण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

त्र्यं. दे. पानसे
शासनाचे सह सचिव.

प्रति,

महालेखापाल, महाराष्ट्र-१, मुंबई [१६० प्रती],
महालेखापाल, महाराष्ट्र-२, नागपूर [४० प्रती],
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई [महाराष्ट्र राज्य] [४० प्रती],
मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
राज्यपालाचे सचिव,
मुख्यमंत्र्याचे सचिव,
उपमुख्यमंत्र्याचे सचिव,
सर्व मंत्री आणि राज्य मंत्री यांचे स्वीय सहाय्यक,
x प्रबंधक , मुळ न्याय शाखा, उच्च न्यायालय, मुंबई,
x प्रबंधक, अपील शाखा, उच्च न्यायालय, मुंबई,
x सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
x सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
x प्रबंधक, लोकआयुक्त व उप लोकआयुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
मंत्रालयाचे सर्व विभाग,
विशेष आयुक्त, महाराष्ट्र सदन, कोपर्निकस रोड, नवी दिल्ली,
मंत्रालयाच्या निरनिराळ्या विभागांच्या अधीन असलेल्या सर्व विभागाचे व कार्यालयाचे प्रमुख,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
संपर्क अधिकारी, मंत्रालय, मुंबई,
वित्त विभागांतील कार्यासन क्रमांक एडीएम-१, एडीएम-४ ते ९
निवड नस्ती, कार्यासन एसईआर-८, वित्त विभाग.

x पत्राद्वारे.

क्र. अस्था-७४/१०८०/ई-५/८१
पुणे दिनांक २९/९/१९८१

प्रत: उपसंचालक भूमि अभिलेख मुंबई/पुणे, नागपूर, औरंगाबाद यांना (उपलब्ध जादा प्रतिसह) माहितीसाठी व मार्गदर्शनासाठी सादर अग्रेषित.
प्रत:- क्र.अ.ई-२, ई-४, अ-१ यांना माहितीसाठी/प्रत- अभिलेखापाल यांना

एच-४०७[८०००+५-७-८३].

जमाबंदी आयुक्त आणि संचालक,
भुमि अभिलेख (म.रा.) पुणे यांच करिता.

मूल ज
युक्त पुणे क.